# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहर बस संचालन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याकरीता तांत्रिक तज्ञ
**{परिवहन विभाग}** (Technical Expert) म्हणून मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांची निविदेद्वारे नियुक्ती करण्यात आलेली असून ही नियुक्ती नागपूर महानगरपालिका व मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांचे दरम्यान झालेला करार दि. ०७/१२/२०१६ नुसार प्रथमत: ७२ महिने (०६ वर्ष) या कालावधी करीता आहे. यानुसार मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांचा ७२ महिन्याचा कालावधी दि. ०६/१२/२०२२ रोजी संपुष्टात आलेला आहे.

नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांच्या नियुक्ती संदर्भात विषय सुरु असून यास अवधी लागण्याची शक्यता आहे. शहर बस संचालनाचे नियत्रंणावर खोळंबा होवू नये व ही सेवा सुचारुपणे अविरत सुरु असावी याकरीता करार नाम्यातील पृष्ठ क्र. १६ वरील कलम १.२.३ मध्ये मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांना ७२ महिन्याचा (जास्तीत जास्त ०६ वर्ष) मुदत वाढ देण्यात येवू शकते असे नमुद आहे.

मा. प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांची मंजुरी दि. १३/१२/२०२२ व ठराव क्र. २०२, दि. १९/१२/२०२२ अन्वये मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS दिल्ली यांना ०३ महिने (मार्च २०२३ पर्यत) किंवा नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांची नियुक्ती होईस्तोवर, यापैकी जो कालावधी आधी असेल, तो पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

नविन मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांची नियुक्ती RFP प्रकाशित करून करण्याची प्रक्रिया सध्या सुरु असून यास अवधी लागण्याची शक्यता आहे. RFP प्रकाशित करून नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटरची नियुक्ती होईस्तोवर दि. ३१/०३/२०२३ नंतर पुढील ०६ महिन्याकरीता किंवा नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांची नियुक्ती होईस्तोवर, यापैकी जो कालावधी आधी असेल, तोपर्यंत दि. ०७/१२/२०१६ रोजी मनपा व मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS दिल्ली यांचे दरम्यान झालेल्या करारनाम्यातील जुन्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 325/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 27/03/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहर बस संचालन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याकरीता तांत्रिक तज्ञ (Technical Expert) म्हणून मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांची निविदेद्वारे नियुक्ती करण्यात आलेली असून ही नियुक्ती नागपूर महानगरपालिका व मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांचे दरम्यान झालेला करार दि. ०७/१२/२०१६ नुसार प्रथमत: ७२ महिने (०६ वर्ष) या कालावधी करीता आहे. यानुसार मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांचा ७२ महिन्याचा कालावधी दि. ०६/१२/२०२२ रोजी संपुष्टात आलेला आहे.

नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांच्या नियुक्ती संदर्भात विषय सुरु असून यास अवधी लागण्याची शक्यता आहे. शहर बस संचालनाचे नियत्रंणावर खोळंबा होवू नये व ही सेवा सुचारुपणे अविरत सुरु असावी

याकरीता करार नाम्यातील पृष्ठ क्र. १६ वरील कलम १.२.३ मध्ये मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS यांना ७२ महिन्याचा (जास्तीत जास्त ०६ वर्ष) मुदत वाढ देण्यात येवू शकते असे नमुद आहे.

मा. प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांची मंजुरी दि. १३/१२/२०२२ व ठराव क्र. २०२, दि. १९/१२/२०२२ अन्वये मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS दिल्ली यांना ०३ महिने (मार्च २०२३ पर्यत) किंवा नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांची नियुक्ती होईस्तोवर, यापैकी जो कालावधी आधी असेल, तो पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

नविन मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांची नियुक्ती RFP प्रकाशित करून करण्याची प्रक्रिया सध्या सुरु असून यास अवधी लागण्याची शक्यता आहे. RFP प्रकाशित करून नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटरची नियुक्ती होईस्तोवर दि. ३१/०३/२०२३ नंतर पुढील ०६ महिन्याकरीता किंवा नविन आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांची नियुक्ती होईस्तोवर, यापैकी जो कालावधी आधी असेल, तोपर्यंत दि. ०७/१२/२०१६ रोजी मनपा व मे. आय.बी.टी.एम. ऑपरेटर DIMTS दिल्ली यांचे दरम्यान झालेल्या करारनाम्यातील जुन्याच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**